अनधिकृत अकृषिक वापर / वापरात बदल केल्याबाबत आकारण्यात आलेल्या दंडाच्या **रक्कमेत सवलत देण्याबाबतची योजना.**

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एनएए १०/२००१/प्र.क्र.४६१/ल-५

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ३० /११/ २००२.

शासन निर्णय:-

राज्याचे महसूल उत्पन्न वाढीच्या दृष्टीने राज्यभरातील अनधिकृत अकृषिक वापराची प्रकरणे शोधून काढून त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची मोहिम शासनाने सुरु केली आहे. अशी अनधिकृत अकृषिक वापराची प्रकरणे त्यांच्या गुणवत्तेनुसार न तपासता सर्वच प्रकरणात सरसकट अकृषिक आकारणीच्या ४० पट दंड भरण्याबाबत संबंधितांना नोटीसा बजावण्यात आल्याचे व त्यांना दंडाची रक्कम व अकृषिक आकारणीची रक्कम भरण्याबाबत क्षेत्रीय अधिका-यांकडून सक्ती करण्यात येत आहे. अशा प्रकारच्या तक्रारी राज्यभरातून शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. तसेच लोकप्रतिनिधींनी देखील याबाबत विधानमंडळाच्या सन २००१ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न विचारले होते. उपरोक्त बाबींचा सखोल अभ्यास करुन शासनाने, शासन निर्णय दि.१४/३/२००२ अन्वये अनधिकृत अकृषिक वापराबाबत आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेत सवलत देण्याची दंड सवलतीची योजना जाहिर केली होती. सदर दंड सवलतीच्या योजनेची मुदत दि.३१/५/२००२ रोजी संपुष्टात आली आहे. सदर योजनेचा कालावधी अल्प असल्यामुळे योजनेचा कालावधी संपण्यापूर्वी सर्व जनतेस हया योजनेची माहिती न झाल्याने व सदर योजनेची माहिती आम जनतेपर्यंत पोहचण्यास विलंब झाल्याने त्याचा लाभ सर्व संबंधितांना घेता आला नाही. त्यामुळे दंड सवलतीची योजना पुन्हा जाहिर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन या योजनेचा लाभ सर्व संबंधितांना मिळावा व शासनाचे महसूली उत्पन्नात भर पडावी. यासाठी शासनाने पुन्हा एकवार दंड सवलतीची योजना अमंलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. तो खालीलप्रमाणे आहे.

(१) अनधिकृत अकृषिक वापर व जमिनीच्या वापरातील बदल यासाठी आकारावयाचा दंड खालीलप्रमाणे आकारण्यात यावा.:-

(अ) अनधिकृत अकृषिक वापर -- रहिवास -- वार्षिक अकृषिक आकारणीच्या एक पट

(ब) अनधिकृत अकृषिक वापर -- औद्योगिक-- वार्षिक अकृषिक आकारणीच्या दीड पट

(क) अनधिकृत अकृषिक वापर -- वाणिज्य -- वार्षिक अकृषिक आकारणीच्या दोन पट

(ड) ज़मिनीच्या अनधिकृत वापरातील बदल असल्यास जो बदललेला वापर असेल त्यास वरील (अ), (ब), व (क) यापैकी जो लागू होईल तो दंड.

(२) दंड सवलतीच्या योजनेच्या कालावधी दि.१/१२/२००२ ते ३१/३/२००३ पर्यंत असेल त्यानंतर ही दंड सवलतीची योजना आपोआप संपुष्टात येईल.

(३) दंड सवलतीची योजना लागू केल्यानंतरही, "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६" चे कलम ४५ अन्वये अनधिकृत अकृषिक वापर नियमित करण्याबाबतच्या कायद्यातील प्रचलित तरतुदी संबंधितांवर बंधनकारक राहतील. ही दंड सवलतीची योजना, दंडांच्या रकमेच्या सवलती पुरतीच मर्यादित राहील. दंडाच्या सवलतीची रक्कम भरली म्हणजे अनधिकृत अकृषिक वापर नियमित झाला असे ग्राहय मानता येणार नाही. त्यासाठी बांधकाम नियमावली व कायद्यातील इतर तरतुदींचे पालन अनधिकृत अकृषिक वापर करतांना केले आहे की नाही याची शहानिशा नेहमीप्रमाणे केल्यानंतरच अनधिकृत अकृषिक वापर नियमानुकूल केल्याचे अंतिम आदेश संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून पारित करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( विकास देशमुख )
उपसचिव
महसूल व वन विभाग